दाखल दिनांक : २८/११/२०१२

नोंदणी दिनांक : २८/११/२०१२

निकाल दिनांक: ०१/०२/२०१८

| कालावधी | : वर्ष | महिने | दिवस |
|---|---|---|---|
| | ०५ | ०२ | ०३ |

**शेवगांव येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, ता. शेवगांव,**

**जि. अहमदनगर यांचे न्यायालयात**

**( पीठासीन अधिकारी : धनंजय भ. हंबीरे यांचेसमोर )**

**आर.सी.सी. क्र. २४२/२०१२** **नि.क्र.३९**

सरकार तर्फे }
पोलीस निरीक्षक, } ... **अभियोग पक्ष.**
शेवगांव पोलीस ठाणे, }
ता. शेवगांव, जि. अहमदनगर. }

**वि रु ध्द**

२. राजु उर्फ राजमहमंद मासुम शेख, }
वय - २५ वर्षे, धंदा - शेती, }
रा. सोनिमियाॅवस्ती, शेवगांव, } ... **आरोपी.**
ता. शेवगांव, जि. अहमदनगर. }

---

**अपराध** : भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९, ५११ सह ३४ अन्वये.

---

अभियोग पक्षातर्फे : श्री. म. म. अदवंत, सहा. सरकारी अभियोक्ता.
आरोपी क्र. २ तर्फे विधिज्ञ : श्री. के. के.गलांडे.

---

## -: न्यायनिर्णय :-

( घोषित दिनांक : ०१/०२/२०१८ )

१. आरोपी क्र. २ यास भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९, ५११ सह ३४ या अपराधासाठी संपरिक्षित करण्यात आलेले आहे.

२. अभियोग पक्षाचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, तक्रारदार नवनाथ वामन कवडे यांनी दिनांक ०७/०८/२०१२ रोजी शेवगांव पोलीस ठाण्यात अशी फिर्याद दिली की, ते राहत असलेल्या ठिकाणी हनुमानाचे मोठे मंदीर आहे व त्यांना त्या मंदीराचे पंच म्हणून नेमलेले आहे. ते व इतर पंच कमेटी म्हणून

काम पाहतात. त्यांच्या मंडळाचे एकुण १५ जनावरे ज्यात गायी व वासरे आहेत व ते मोकाट फिरतात आणि मंदीराजवळ येवून बसतात व ते त्या जनावरांची देखभाल करतात. त्या दिवशी दुपारी ४ वाजताच्या सुमारास त्यांना अशी चर्चा समजली की, मंडळाच्या गायी कोणीतरी पकडून अमरधामजवळ काटवणात बांधल्या आहेत. त्यामुळे ते, उध्दव काळे, मच्छिंद्र बर्वे, ज्ञानेश्वर काळे व इतर त्या बाभळीच्या काटवणात गेले. त्यांनी त्यांच्या संस्थानच्या चार गायी ओळखल्या, त्यांचे पाय बांधून त्यांना खाली पाडले होते व त्या ठिकाणी पाच लोक गायी धरून उभे होते. त्यांना पाहून टीव्हीएस मोटारसायकल क्र. एम.एच.०३/एक्य-४४९० यावर दोघेजण बसून पळून गेले. तसेच दोघेजण पायी पळून गेले व त्यांनी एकास पकडले व त्याने त्याचे नांव जमीन रहिम शेख, रा. जामखेड, ता. अंबड, जि. जालना असल्याचे सांगितले व त्याने त्या गायी विकत घेतल्या असे सांगितले. त्यानंतर त्यांनी त्या गायी ताब्यात घेतल्या आणि पकडलेला इसम जमीर शेख यास पोलीस ठाण्यात आणले. त्या गायी जमीर शेख व इतर कत्तलखान्यात वापरण्यासाठी चोरून घेवून जात होते.

३. तक्रारदाराच्या तक्रारीवरून शेवगांव पोलीस ठाण्यात गु.र.क्र. १७१/२०१२ हा भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३७९, ५११ सह ३४ अन्वये नोंदला गेला. तपासिक अंमलदाराने तपासा दरम्यान साक्षीदारांची तपास टिपणे नोंदविली, दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला, अटक पंचनाम्याद्वारे आरोपींना अटक केली, आणि संपूर्ण तपासाअंती आरोपी क्र. १ व २ यांच्याविरूध्द आणि फरार आरोपी क्र. ३ फिरोज हासन कुरेशी आणि अनोळखी दोन यांच्या विरूध्द फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २९९ प्रमाणे दोषारोपपत्र दाखल केले.

४. प्रस्तुतच्या प्रकरणात आरोपी क्र. १ जमीर रहीम शेख हा हजर राहत नसल्यामुळे त्याच्या विरूध्द वेळोवेळी अटक वॉरंट काढले गेले, परंतु त्याची बजावणी झाली नाही. त्यानंतर आरोपी क्र. २ याच्यातर्फे दिलेला अर्ज नि.क्र. १६ बाबत नि.क्र. १ खालील दिनांक ०३/१२/२०१६ रोजीच्या आदेशानुसार प्रस्तुतचे प्रकरण आरोपी क्र. १ आणि फरार आरोपी क्र. ३ यांच्यापासून वेगळे करून आरोपी क्र. २ याच्या मर्यादेपुरते चालविण्यात आले.

५. आरोपी क्र. २ याच्याविरूध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९, ५११ सह ३४ या अपराधाकरिता दोषारोप नि.क्र. २० अन्वये ठेवला. दोषारोपपत्रातील मजकूर आरोपीस मराठीत वाचून दाखविला व समजावून सांगितला. आरोपीने त्यास अपराध कबूल नसल्याचे सांगून संपरीक्षेची इच्छा

दर्शविली.

६. आरोपीविरुध्द अपराध सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने साक्षीदार क्र. १ तक्रारदार नवनाथ वामन कवडे यांना नि.क्र. २२ अन्वये तपासले तसेच साक्षीदार क्र. २ म्हणून मच्छिंद्र अंकुश बर्वे यांना नि.क्र. २७ अन्वये, साक्षीदार क्र. ३ म्हणून ज्ञानेश्वर भाउसाहेब काळे यांना नि.क्र. २८ अन्वये, साक्षीदार क्र. ४ म्हणून उध्दव महादेव काळे यांना नि.क्र. ३० अन्वये, साक्षीदार क्र. ५ म्हणून सुरेश बन्सी काळे यांना नि.क्र. ३२ अन्वये आणि साक्षीदार क्र. ६ म्हणून तपासीक अंमलदार शिवनाथ दगडु महानोर यांना नि.क्र. ३६ अन्वये तपासले.

७. संपरिक्षेमध्ये पुराव्यात आलेल्या परिस्थितीचा व्यक्तिश: खुलासा करण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अन्वये आरोपीची साक्षतपासणी नि.क्र. ३८ अन्वये नोंदविली. आरोपीचा थोडक्यात बचाव असा आहे की, त्याचे विरुध्द खोटी केस केलेली आहे, त्यामुळे त्यास दोषमुक्त करण्यात यावे.

८. अभियोग पक्षाचा पुरावा विचारात घेतला. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपी क्र. २ चे विधिज्ञ श्री. के. के. गलांडे यांचा युक्तिवाद ऐकला असता, माझे विचारार्थ खालील मुद्दे निघाले व त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसासहित मी खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| (१) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, दिनांक ०७/०८/२०१२ रोजी दुपारी ०४:१० वाजताच्या सुमारास मौजे शेवगांव गांवाचे अमरधामालगत सोनिमियाँ दर्ग्याजवळ, ता. शेवगांव येथे आरोपी क्र. २ याने आरोपी क्र. १ व ३ यांचेसह आणि अनोळखी दोन साथीदार यांच्यासह, त्यांच्या समान उद्देशाच्या पुर:सरणार्थ तक्रारदार नवनाथ वामन कवडे हे शेवगांव येथील हनुमान मंदीराच्या हनुमान पंच मंडळाचे पंच म्हणून काम करतात व त्यांच्या हनुमान पंच मंडळाच्या चार गायी रक्कम रूपये ४०,०००/- किंमतीच्या कत्तलखाण्यात कापण्यासाठी तक्रारदाराच्या संमत्तीशिवाय अप्रामाणिकपणे घेवून जाण्याच्या उद्देशाने तश्या त्या घेता याव्यात यासाठी स्थानभ्रष्ट करून चोरल्या व अशाप्रकारे त्यांनी भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराध केला ? | **... नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| (२) | अभियोग पक्षाने पुढे हे सिध्द केले आहे का की, उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. २ याने आरोपी क्र. १ व ३ यांचेसह आणि अनोळखी दोन साथीदार यांचेसह त्यांच्या समान उद्देशाच्या पुर:सरणार्थ तक्रारदार यांच्या चार गायींची चोरी करण्याचा प्रयत्न केला व ते त्या गायी घेवून जात असतांना मिळून आले व अशाप्रकारे त्यांनी भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ५११ सह ३४ अन्वये अपराध केला ? | **... नकारार्थी.** |
| (३) | काय आदेश ? | **... अंतिम आदेशा प्रमाणे.** |

## <u>कारणमीमांसा</u>

**<u>मुद्दा क्र. १ व २ बाबत :-</u>**

९. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी असा युक्तीवाद केला की, अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. १, ४ व ६ यांचा पुरावा विचारात घेतला तर हनुमान मंडळाच्या चार गायींची चोरी झाली होती व त्या गायी आरोपी क्र. १ सहित इतर आरोपींकडू मिळून आल्या, हे स्पष्ट होते. त्यामुळे तपासीक अंमलदार साक्षीदार क्र. ६ यांचा पुरावा विचारात घेतला तर आरोपी क्र. २ याचा त्या चोरीच्या गुन्ह्यात सहभाग असल्याचे स्पष्ट होते आणि आरोपी क्र. २ विरूध्दचा अपराधात्मक पुरावा साक्षीदार क्र. ६ यांच्या पुराव्यात अभिलेखावर आलेला आहे.

१०. आरोपी क्र. २ चे विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. १, ४ व ६ यांच्या पुराव्यात आरोपी क्र. २ विरूध्द काहीही अपराधात्मक पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. २, ३ व ५ यांनी अभियोग पक्षास उपयुक्त होईल, अशी साक्ष दिलेली नाही. तसेच आरोपी क्र. २ याच्याकडून कोणतीही गाय तपासा दरम्यान जप्त करण्यात आलेली नाही. त्यामुळे आरोपी क्र. २ याने भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ व ५११ सह ३४ अन्वये गुन्हा केला आहे, हे सिध्द होत नाही.

११. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. १ तक्रारदार नवनाथ कवडे यांच्या पुराव्यात नि.क्र. २२ मध्ये असे आले आहे की, भगतसिंग चौक शेवगांव येथील हनुमान मंदीराच्या पंच कमीटीत ते पंच म्हणून आहेत व त्या मंदीरात गायी आहेत. दिनांक ०७/०८/२०१२ रोजी ते भगतसिंग चौकात असतांना त्यांच्या मंदीराच्या गायी चोरीस गेल्याचे त्यांच्या गल्लीतील मुलांनी त्यांना सांगितले, त्यामुळे ते,

मच्छिंद्र बर्वे व ज्ञानेश्वर काळे त्या ठिकाणी गेले. तेंव्हा त्यांच्या गायींचे पाय बांधलेले होते व तेथे पाच आरोपी होते. त्यापैकी दोघेजण मोटारसायकलवर आणि दोनजण पायी पळून गेले. तेंव्हा त्यांनी एका आरोपीला तेथेच धरले व त्याने त्याचे नांव जमीर शेख असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांनी फिर्याद नि. क्र. २३ दिली. ते आरोपी जमीर यास दाखविले तर ओळखू शकतात. त्यांना त्यावेळेस पळून गेलेले आरोपी दिसले नव्हते.

१२. तक्रारदार यांचा उपरोक्त पुरावा जसाचा तसा ग्राह्य धरला तरी आरोपी क्र. २ राजु याच्या विरूध्द त्यांच्या पुराव्यात काहीही अभिलेखावर आले नसल्याचे दिसून येते.

१३. तक्रारदार साक्षीदार क्र. १ यांचा पुरावा नि.क्र. २२ आणि फिर्याद नि.क्र. २३ हे एकत्रीतरित्या विचारात घेतले तर असे दिसून येते की, दिनांक ०७/०८/२०१२ रोजी त्या दिवशी तक्रारदार यांच्या सोबत मच्छिंद्र बर्वे आणि ज्ञानेश्वर काळे हे सोबत होते. परंतु अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. २ मच्छिंद्र बर्वे आणि साक्षीदार क्र. ३ ज्ञानेश्वर काळे यांनी अभियोग पक्षास उपयुक्त होईल, अशी साक्ष दिलेली नाही. त्यांच्या पुराव्यात कोणत्याही आरोपीविरूध्द काहीही अपराधात्मक पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

१४. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. ४ उध्दव काळे यांच्या पुराव्यात नि.क्र. ३० मध्ये असे आले आहे की, जेंव्हा त्यांना कळाले की, अमरधाम येथील हनुमान मंदीराजवळ कोणीतरी गायी पकडत आहे आणि ५ - ६ गायी चोरीसाठी पकडल्या होत्या. तेंव्हा ते, नवनाथ आणि इतर यांच्या सोबत अमरधाम मंदीराच्या पाठीमागे गेले. तेंव्हा त्यांना पाच ते सहा गायी दिसल्या. दोन ते चारजण त्या गायी कापण्यासाठी चोरून नेण्याचा प्रयत्न करीत होते. त्यापैकी त्यांनी एकाला पकडले आणि बाकीचे मोटारसायकलवर पळून गेले. पकडलेल्या इसमाचे नाव जमीर होते.

१५. आरोपी क्र. २ च्या विधिज्ञांनी घेतलेल्या उलटतपासा दरम्यान त्या साक्षीदारास कोर्टात हजर असलेला आरोपी क्र. २ दाखवून असा प्रश्न विचारला की, कोर्टात हजर असलेला आरोपी तेथे हजर होता का ? तेंव्हा साक्षीदार क्र. ४ यांनी 'नव्हता' असे उत्तर दिले. या परिस्थितीत साक्षीदार क्र. ४ यांच्या पुराव्यातही आरोपी क्र. २ च्या विरूध्द काहीही अपराधात्मक पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

१६. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. ५ बन्सी काळे हे घटनास्थळ पंचनाम्याचे पंच आहेत, परंतु त्यांनीही अभियोग पक्षास उपयुक्त होईल, अशी साक्ष दिली नाही. त्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्या पंचाचा उलटतपास घेतला, परंतु त्या उलटतपासा दरम्यान अभियोग पक्षास उपयुक्त होईल, असे काहीही अभिलेखावर आलेले नाही.

१७. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. ६ तपासीक अंमलदार यांच्या पुराव्यात असे आले आहे की, जेंव्हा या गुन्ह्याचा तपास त्यांच्याकडे देण्यात आला, तेंव्हा त्यांनी जमीर शेख याच्याकडे चौकशी केली असता त्याने राजु शेख हा गायी चोरीच्या संदर्भात त्याच्या सोबत असल्याचे सांगितले आणि चौकशी अंती त्यांनी जमीर शेख व राजु शेख यांना या गुन्ह्यात अटक केली. त्यांनी दोन पंचाच्या समक्ष दुसरे दिवशी घटनास्थळ पंचनामा तयार केला. त्यांच्या तपासात दोन अनोळखी इसमांची नांवे निष्पन्न झाली नाहीत.

१८. आरोपी क्र. १ हा सतत गैरहजर राहत असल्यामुळे नि.क्र. १ खालील दिनांक ०३/१२/२०१६ रोजीच्या आदेशानुसार प्रस्तुतचे प्रकरण आरोपी क्र. १ याचेपासून वेगळे करून चालविण्यात आलेले आहे. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. १ व ४ यांच्या पुराव्यात आरोपी क्र. २ राजु शेख याच्या विरूध्द काहीही अपराधात्मक पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अभियोग पक्षाचे इतर साक्षीदार क्र. २, ३ व ५ यांनी अभियोग पक्षास उपयुक्त होईल, अशी साक्ष दिलेली नाही. तसेच आरोपी क्र. २ याच्याकडून तपासा दरम्यान एकही गाय जप्त करण्यात आलेली नाही. त्यामुळे या परिस्थितीत केवळ तपासीक अंमलदाराचे म्हणणे की, त्यांना जमीर शेख याने चौकशी दरम्यान त्या गायी चोरीच्या संदर्भात राजु शेख त्याच्या सोबत होता, केवळ हे म्हणणे आरोपी क्र. २ राजु शेख याचा त्या चोरीच्या गुन्ह्यात सहभाग होता व त्यांनी त्या चार गायी चोरल्या अथवा आरोपी क्र. २ हा त्या चार गायींची चोरीचा प्रयत्न करतांना व त्या गायी घेवून जात असतांना मिळून आला, असे म्हणता येवू शकत नाही.

१९. उपरोक्त सर्व परिस्थिती विचारात घेतली असता, दिनांक ०७/०८/२०१२ रोजी दुपारी ०४:१० वाजताच्या सुमारास मौजे शेवगांव गांवाचे अमरधामालगत सोनिमियॉं दर्ग्याजवळ, ता. शेवगांव येथे आरोपी क्र. २ याने आरोपी क्र. १ व ३ यांचेसह आणि अनोळखी दोन साथीदार यांच्यासह, त्यांच्या समान उद्देशाच्या पुर:सरणार्थ तक्रारदार नवनाथ वामन कवडे हे शेवगांव येथील हनुमान मंदीराच्या हनुमान पंच मंडळाचे पंच म्हणून काम करतात व त्यांच्या हनुमान पंच मंडळाच्या चार गायी

रक्कम रूपये ४०,०००/- किंमतीच्या कत्तलखाण्यात कापण्यासाठी तक्रारदाराच्या संमत्तीशिवाय अप्रामाणिकपणे घेवून जाण्याच्या उद्देशाने तश्या त्या घेता याव्यात यासाठी स्थानभ्रष्ट करून चोरल्या तसेच तक्रारदार यांच्या चार गायींची चोरी करण्याचा प्रयत्न केला व ते त्या गायी घेवून जात असतांना मिळून आले, या सर्व बाबी अभियोगपक्षाने नि:संशयरित्या सिध्द केल्या नाहीत. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ व २ चा निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ बाबत</u> :-**

२०. मुद्दा क्र. १ व २ यांचा निष्कर्ष नकारार्थी आलेला आहे.

२१. दिनांक ०७/०८/२०१२ रोजीची फिर्याद नि.क्र. २३ विचारात घेतली तर तक्रारदाराने आरोपी क्र. १ जमीर रहीम शेख आणि इतर चार अनोळखी साथीदार यांच्या विरूध्द फिर्याद दिली असल्याचे दिसून येते. तपासिक अंमलदाराने संपूर्ण तपासाअंती आरोपी क्र. १ व २ यांच्याविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले आणि आरोपी क्र. ३ व दोन अनोळखी साथीदार यांच्या विरूध्द फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २९९ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले. तेंव्हा पासून आजपर्यंत आरोपी क्र. ३ फिरोज हसन कुरेशी व दोन अनोळखी साथीदार यांना तपासिक अंमलदाराने अटक करून न्यायालयासमोर हजर केलेले नाही. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. १, ४ व ६ यांच्या पुराव्यात फरार आरोपी क्र. ३ फिरोज हसन कुरेशी व दोन अनोळखी साथीदार यांच्या विरूध्द काहीही अपराधात्मक पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचा सर्व पुरावा विचारात घेतल्यावर त्याचे खंडन न झाल्यास, फरार आरोपी क्र. ३ व दोन अनोळखी साथीदार यांना सिध्ददोष ठरविणे समर्थनिय होईल, असे कोणतेही तथ्य त्यांच्याविरूध्द सिध्द करण्यात आलेले नाही. त्यामुळे उपरोक्त सर्व परिस्थिती विचारात घेउन, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

(१) आरोपी क्र. २ राजु उर्फ राजमहंमद मासूम शेख, रा. शेवगांव यास भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९, ५११ सह ३४ या अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८ (१) नुसार दोषमुक्त करण्यात येत आहे.

(२) आरोपी क्र. २ चे वैयक्तिक बंधपत्र व जामीनकदबा रद्द करण्यात येत आहे.

(३) आरोपी क्र. २ ने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ अन्वये रक्कम रुपये ७५००/- चा वैयक्ती बंधपत्राचा व तितक्याच रकमेच्या जामीनकदब्याचा जामीन द्यावा.

(४) आरोपी क्र. ३ व दोन अनोळखी साथीदार यांना फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २४५ नुसार विनादोषारोप सोडण्यात येत आहे.

(५) प्रस्तुतचे प्रकरण नि.क्र. १ खालील दिनांक ०३/१२/२०१६ रोजीच्या आदेशानुसार आरोपी क्र. १ जमीर रहिम शेख, रा. बुध्दनगर जामखेड, ता. अंबड, जि. जालना याचेपासून वेगळे (स्पील्टअप) करून चालविलेले आहे. त्यामुळे प्रस्तुतचे प्रकरण आरोपी क्र. १ विरूध्द प्रलंबित ठेवण्यात येत आहे.

( धनंजय भ. हंबीरे )
दिनांक : ०१/०२/२०१८. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, शेवगांव,
ता. शेवगांव, जि. अहमदनगर.